बातमीपत्र

## पोलीस आयुक्तालय, सोलापूर शहर

### माहिती कक्ष, दि ०३ जून २०२४

## फौजदार चावडी पोलीस ठाणे

| | | |
|---|---|---|
| **गु.र.नं व कलम** | : | ३५५/२०२४ भादवि २७९,३३८, मोवाकाक १८४,१३४(अ),१७७ प्रमाणे |
| **गु.घ.ता.वेळ/ठि.** | : | दि. २८/०५/२०२४ रोजी २१.१० वा चे सुमारास, सोलापूर विदयापीठ समोर, सोलापूर |
| **गु.दा.ता.वेळ** | : | दि ०२/०६/२०२४ रोजी ०२.२९ वा. |
| **फिर्यादीचे नाव** | : | विकास सुरेश दोरकर, वय- २८ वर्षे, रा. जोशी गल्ली, बाळे, सोलापूर |
| **आरोपीचे नाव** | : | फरजान मुस्ताक अचकल, वय- २५ वर्षे, रा. ०१, पीस रेसीडेन्सी, जेलरोड पोलीस ठाणे समोर, सोलापूर |
| **हकिकत** | : | यात हकिकत अशी की, वरील वेळी व ठिकाणी, यातील पुणे ते सोलापूर कडे येणारे सर्व्हिस रोडवरुन फिर्यादीचे वडील सुरेश दोरकर हे कामावरुन घरी पायी चालत येत असताना मागुन येणारा वरील आरोपीत याने त्याचे ताब्यातील कार क्रं. एम एच १२ एस वाय ८५९३ ही हयगयीने, निष्काळजीपणाने भरधाव वेगात चालवून फिर्यादीचे वडीलांना धडक दिल्याने त्यात त्यांचे उजवे पायास, उजवे छातीस व डोक्याला सर्वांगास मार लागुन गंभीर जखमी करणेस कारणीभुत झाला आहे. तसेच वडीलांना उपचारास घेवून न जाता तेथुन पळुन गेला आहे म्हणून. तपास:- पोहेकॉ/ ११८६ घुगे- |

## फौजदार चावडी पोलीस ठाणे

| | | |
|---|---|---|
| **गु.र.नं व कलम** | : | ३५७/२०२४ भादवि २७९,३३८, मोवाकाक १८४,१३४(अ),(ब) प्रमाणे |
| **गु.घ.ता.वेळ/ठि.** | : | दि. ३१/०५/२०२४ रोजी ०२.०० वा चे सुमारास, केगाव रोड, सोलापूर |
| **गु.दा.ता.वेळ** | : | दि ०२/०६/२०२४ रोजी १९.११ वा. |
| **फिर्यादीचे नाव** | : | विठ्ठल सिद्राम चव्हाण, वय- ३१ वर्षे, रा. मु.पो. कोंडी, ता. उत्तर सोलापूर, जि. सोलापूर |
| **आरोपीचे नाव** | : | इरटिगा कार क्रं. एम एच १३ डी वाय ७६६९ चा अज्ञात चालक |
| **हकिकत** | : | यात हकिकत अशी की, वरील वेळी व ठिकाणी, यातील फिर्यादीचा मित्र प्रविण भोसले याची मोटार सायकल दुरुस्त झाल्याने केंडी गावाकडे फिर्यादी व मित्र प्रफुल्ल वाघचवरे असे मिळुन मोटार सायकल क्रं. एम एच १३ डी एल ५३४३ यावरुन जात असताना नमुद आरोपीत वाहन चालकाने त्याचे ताब्यातील वाहन हयगयीने, निष्काळजीपणाने, बेदकारपणे, भरधाव वेगात चालवुन फिर्यादी चालवित असलेल्या मोटार सायकलला मागुन धडक देवून अपघात करुन त्यात फिर्यादीस उजवे पायास गंभीर दुखापत करुन फ्रॅक्चर होणेस व मित्र वाघचवरे याचे डावे पायास फ्रॅक्चर होणेस कारणीभुत ठरला आहे म्हणून. तपास:- पोना- १३८५ कसबे- |

## जेलरोड पोलीस ठाणे

| | | |
|---|---|---|
| **गु.र.नं व कलम** | : | २७३/२०२४ भादवि ३७९ प्रमाणे |
| **गु.घ.ता.वेळ/ठि.** | : | दि. २४/०५/२०२४ रोजी १९.३० वा ते दि. २५/०५/२०२४ रोजी ०७.३० वा चे दरम्यान, मार्केट यार्ड, सोलापूर |
| **गु.दा.ता.वेळ** | : | दि ०२/०६/२०२४ रोजी १३.०३ वा. |
| **फिर्यादीचे नाव** | : | सोहेल मुनाफ निंबाळकर, वय- २३ वर्षे, रा. ३५६, हिदायतुल कायनात मस्जिद जवळ, मड्डी वस्ती, सोलापूर |
| **आरोपीचे नाव** | : | अज्ञात चोरटा |
| **गेला माल** | : | ६०,०००/- रु एक काळया रंगाची त्यावर लाल पट्टा असलेली होन्डा शाईन मोटार सायकल |
| **हकिकत** | : | यात हकिकत अशी की, वरील वेळी व ठिकाणी, यातील फिर्यादीची वरील वर्णनाची व किंमतीची मोटार सायकल क्रं. एम एच १३ ई एच ४५२२ ही वरील ठिकाणी हॅन्डल लॉक करुन पार्क केली असताना, कोणीतरी अज्ञात चोरटयाने फिर्यादीचे संमतीवाचून, मुद्दाम लबाडीने चोरुन नेली आहे म्हणून. तपासः- पोना- १३८१ गंगावणे- |

## एमआयडीसी पोलीस ठाणे

| | | |
|---|---|---|
| **गु.र.नं व कलम** | : | ३४८/२०२४ भादवि ३७९ प्रमाणे |
| **गु.घ.ता.वेळ/ठि.** | : | दि. २८/०५/२०२४ रोजी १२.०० वा ते १४.०० वा चे दरम्यान, एच ग्रुप विडी घरकुल, सोलापूर |
| **गु.दा.ता.वेळ** | : | दि ०२/०६/२०२४ रोजी १८.३८ वा. |
| **फिर्यादीचे नाव** | : | रमजान मकदुमसाब नदाफ, वय- ५२ वर्षे, रा. १६६, सरवदे नगर, मुळेगाव रोड, सोलापूर |
| **आरोपीचे नाव** | : | अज्ञात चोरटा |
| **गेला माल** | : | १५,०००/- रु एक हिरो होन्डा कंपनीची लाल काळया रंगाची फॅशन प्लस मोटार सायकल |
| **हकिकत** | : | यात हकिकत अशी की, वरील वेळी व ठिकाणी, यातील फिर्यादीची वरील वर्णनाची व किंमतीची मोटार सायकल क्रं. एम एच १३ ए पी ००१३ ही वरील ठिकाणी पार्क केली असताना, कोणीतरी अज्ञात चोरटयाने फिर्यादीचे संमतीवाचून, मुद्दाम लबाडीने चोरुन नेली आहे म्हणून. तपासः- पोहेकॉ/ ६२५ उबाळे- |

## सदर बझार पोलीस ठाणे

| | | |
|---|---|---|
| **गु.र.नं व कलम** | : | ४१९/२०२४ भादवि ३२४,३२३,५०४,३४ प्रमाणे |
| **गु.घ.ता.वेळ/ठि.** | : | दि. ०१/०६/२०२४ रोजी १२.१५ वा चे सुमारास, सुशिल गायकवाड यांचे पान टपरीवर सोलापूर |
| **गु.दा.ता.वेळ** | : | दि ०२/०६/२०२४ रोजी ०२.०२ वा. |
| **फिर्यादीचे नाव** | : | छोटुलाल नागनाथ घागरे, वय- ४७ वर्षे, रा. ११७, न्यु संजय नगर, कुमठा नाका, सोलापूर |

| | | |
|---|---|---|
| **आरोपीचे नाव** | **:** | १) सुशिल गायकवाड, २) राहुल गायकवाड, ३) जयदेव गायकवाड, रा. संजय नगर, कुमठा नाका, सोलापूर. |
| **हकिकत** | : | यात हकिकत अशी की, वरील वेळी व ठिकाणी, सन २०१९ मध्ये आरोपीत क्रं. १ यास हातउसने म्हणून २५,०००/- रु व आरोपीत क्रं. २ यास ५,०००/- रु हातउसने दिलेले पैसे परत मागण्याकरीता त्याचे पानटपरीवर गेले असता, आरोपीत क्रं. १ याने हाताने कानाखाली जोरात मारला व आरोपीत क्रं. २ याने लाथाबुक्यांनी मारहाण केली. तसेच आरोपीत क्रं. ३ याने बांबुचा वासाने फिर्यादीचे डोक्यात मारुन जखमी केले आहे म्हणून. तपासः- पोहेकॉ/ ४२१ ईनामदार |